सबला

# पर्यावरण पूरक शुभेच्छांची 'मानसी'!



शुभेच्छा या प्रत्येक माणसाच्या आयुष्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे असतात. शुभ कार्य, त्याचबरोबर एखाद्या क्षेत्रामध्ये प्राप्त केलेला नावलौकिक, याशिवाय नवनियुक्ती, लग्नसमारंभ, गृहप्रवेश आणि जन्मदिवस यासाठी पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले जाते. गेल्या काही वर्षांपासून वेगवेगळ्या फुलांचे गुच्छ भेट म्हणून दिले जातात.कोणत्याही सण समारंभात पाहुण्यांना पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्याची प्रथा आहे. सन्मानानंतर संध्याकाळपर्यंत सुकणारा बुके काही जण घरी नेतात.तर कोणी तिथेच विसरून जातात सुकणाऱ्या या फुलांचे दुसऱ्या दिवशी निर्माल्य होते. अनेकदा हा कचरा डम्पिंग ग्राउंड वर जातो. परिणामी हा सन्मान आणि पुष्परुपी दिलेल्या शुभेच्छा फारशा स्मरणात राहत नाही. त्याचे विस्मरण अनेकांना होते. स्नेह आणि प्रेम कायम राहण्यासाठी उपयोगी आणि आपल्यासमोर राहणारा गुच्छ सध्या मार्केटमध्ये आलेला आहे. होय फुलाला

पर्याय म्हणून सध्या टॉवेल आणि नॅपकिनच्या फुलांचे गुच्छ देण्याचा ट्रेंड वाढत आहे. अशा प्रकारचे रुमाल व नॅपकिन बुके दैनंदिन वापरात येत असल्याने पाहुणे तसेच सन्मानमूर्ती यांचा आनंद आणि स्नेह द्विगुणीत होतो. यात पैशांचा अपव्यय होत नाही. आणि त्याचा दैनंदिन उपयोग सुद्धा होतो.या नव्या व्यवसायामुळे महिला आणि पुरुषांना रोजगार प्राप्त होतो. कामोठे येथील मानसी गोरखनाथ पोळ या युवतीने अशाप्रकारे बुके निर्मितीचा व्यवसाय सुरू केला आहे. नॅपकिन बुकेमध्ये अनेक प्रकारचे बुके या ठिकाणी बनवले जातात. ससा, बाहुली किंवा गुलाबासह अन्य फुलांच्या आकाराचा बुके तयार करता येतात. त्यांनी आजपर्यंत मुंबई, कल्याण, पुणे, उरण, पेण, रोहा, शिरवळ, भोर, ठाणे, मानगाव येथील २२ हजारांपेक्षाही जास्त ग्राहकांना हे बुके पोहोचवले आहेत. यासाठी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्र वा लग्न समारंभ वाढदिवस अशा कार्यक्रमांतून बुकेंना भरघोस प्रतिसाद मिळतो. हे बुके वेगवेगळ्या आकाराचे आहेत, तसेच चांगल्या प्रतीच्या रुमालापासून बजेटनुसार बनवले जातात. त्याचा पुनर्वापर करता येत असल्याने पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून हा व्यवसाय अत्यंत उपयुक्त आहे. छोट्या टॉवेलपासून बुके तयार केले जातात. हे बुके ९९ टक्के सुती असल्याने गरजेनुसार ते वेगवेगळ्या ठिकाणी उपयोगात आणता येतात.

अगदी किचनमध्येही आकारानुसार ते वापरता येतात. महिलांना त्याचा सर्वाधिक उपयोग होतो.

इतकेच नव्हे तर एखाद्या "इव्हेंट" साठी विशिष्ट आकाराचे बुके बनवण्यापासून टेबलवर ठेवण्यासाठी 'स्टँड' बुकेपर्यंत



सर्व प्रकार, आकार त्यात करता येतात. यासाठी महिला कामगारांना प्रशिक्षण दिले जात आहे.

मानसी पोळ यांच्या या प्रकल्पात कोन नॅपकिन', 'स्टँड नॅपकिन', 'चक्र नॅपकिन' असे बनवले जातात. ५० रुपयांपासून हजार रुपयांपर्यंतचे नॅपकिन बुके उपलब्ध आहेत. निर्माल्य होणाऱ्या फुलांच्या बुकेपेक्षा रुमाली बुकेच्या ट्रेंडने बाजारपेठेत शिरकाव केला असून, ते ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहेत. रुमाल किंवा नॅपकिन बुकेंना सण-समारंभात मागणी वाढली आहे. ग्राहकांना पसंत पडतील व परवडतील, अशा पद्धतीने हे बुके बनवले जातात. रुमाल किंवा नॅपकिन या वस्तू आपण दैनंदिन जीवनात वापरत असतो. त्या जर आपल्याला भेट स्वरूपात भेटल्या, तर त्याचा आनंद होतो. असे सांगताना मानसी पोळ या युवा उद्योजकीच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहिल्याशिवाय राहत नाही. या व्यवसायाचे ब्रँडिंग करण्यासाठी तिने सोशल मीडिया चा वापर केला आहेच. त्याचबरोबर स्वतंत्र वेबसाईट सुद्धा सुरू केले आहे. पनवेल परिसरामध्ये अत्यंत कमी वयामध्ये अशा प्रकारचा उद्योग थाटून मानसीने आश्वासक पाऊल उचलले आहे.

♀♀♀



71/92

Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner